MHAK060002302026

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | .. | २१.०१.२०२६ |
| नोंदणी तारीख | .. | २२.०१.२०२६ |
| निर्णय दिनांक | .. | ०६.०३.२०२६ |
| कालावधी | | व म दि |
| | | ०० ०१ १३ |

**<u>दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर अकोट, जि. अकोला यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन न्यायाधीश शिवनाथ एम. काळे )

**हिंदु विवाह अर्ज क्रं. २४/२०२६.** **निशाणी क्रं.१३**

१. संदेश भिमराव गवई,
वय अं. ३१ वर्षे, व्यवसायः मजूरी,
रा. राहुल नगर, अकोट, ता. अकोट,
जिल्हा अकोला.

२. सौ. अंजली संदेश गवई,
(लग्नाअगोदरचे नांव कु.अंजली भाउदेव वाहुरवाघ)
वय अं. २८ वर्षे, व्यवसायः घरकाम,
द्वाराः भाउदेव जगदेवराव वाहुरवाघ,
रा. रामदेवबाबा नगर, अकोट, ता. अकोट,
जिल्हा अकोला. ... **अर्जदार.**

**– विरुध्द –**

कोणीही नाही. ... **गैरअर्जदार.**

**हिंदु विवाह कायदयाचे कलम १३ (ब) अन्वये सहसंमतीने घटस्फोट मिळण्याकरिता.**

..........................................................................................

विधीज्ञ श्री. वाजीद अली, अर्जदार क्रं.१ व २ करीता.
गैरअर्जदार निरंक.

..........................................................................................

**न्या य नि र्ण य**

(घोषित दिनांक ०६.०३.२०२६)

अर्जदारांनी एकमेकांच्या सहसंमतीने घटस्फोटाकरिता हे प्रकरण दाखल केले आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे कीः–**

०२. अर्जदार क्रं. १ व २ यांचा दिनांक ०२.०७.२०२१ रोजी बौध्द धर्मानुसार जातीतील रितीरिवाजाप्रमाणे अकोट, ता. अकोट, जिल्हा अकोला येथे विवाह होवून लग्नसंबंध प्रस्थापित झाले. लग्नानंतर अर्जदार क्रं. २ ही अर्जदार क्रं. १ च्या घरी नांदावयास गेली. लग्ननानंतर अर्जदार क्रं.१ व २ यांच्यामध्ये लहानसहान कारणांवरुन तात्वीक मतभेद, वादविवाद होत होते. तसेच मतभिन्नतेमुळे सुरुवातीपासुनच अर्जदारांमध्ये पटत नव्हते. म्हणुन अर्जदार क्रं.२ ही दिनांक २९.०६.२०२२ पासुन तिच्या माहेरी विभक्त राहत आहे. अर्जदारांच्या नातेवाईकांनी त्यांना बरेच वेळा समजावुन सांगुनही त्यांच्यात समेट घडुन आला नाही व दिवसेंदिवस त्यांच्यातील वाद विकोपाला गेला. अर्जदार क्रं.१ व २ यांच्या मधील मतभेद पराकाष्टेला जाउन दोघांचे वडीलधारी व्यक्तींचे व नातेवाईकांचे प्रयत्न निष्फळ होवून वैवाहिक संबंध विकोप्यास जावून पुनर्स्थापितीपलिकडे गेलेले आहेत. अर्जदार क्रं.१ व २ यांचे भविष्यात आपसात पटणे शक्य नसल्यामुळे त्यांनी आपसी समझोत्याने घटस्फोट घेण्याचे ठरविले आहे. अर्जदार यांना कोणतेही अपत्य नसून आज रोजी अर्जदार क्रं.२ ही अर्जदार क्रं.१ पासून गर्भवती नाही.

०३. उभयपक्षांनी संमतीने फारकती घेण्याचा निर्णय घेतला आहे. अर्जदार क्रं.२ याने अर्जदार क्रं.१ हिला भविष्यातील खावटीपोटी एकमुस्त रक्कम म्हणुन रुपये २,००,०००/– दिले. अर्जदार एकमेकांच्या मालमत्तेमध्ये हक्क दाखविणार नाही आणि याबाबत ते न्यायालयामध्ये एकमेकांविरुध्द केस दाखल करणार नाही. अर्जदारांचे एकमेकांकडे असलेले लग्नाचे वैयक्तीक व इतर फोटो यांचा कोणीही दुरुपयोग करणार नाही तसेच सदर फोटो सोशल मिडीयावर सुध्दा टाकणार नाही तसेच दोघांनी एकमेकांची किंवा नातेवाईकांची समाजामध्ये कोणत्याही प्रकारची बदनामी करणार नाही. फारकतीचा आदेश झाल्यापासून अर्जदार भविष्यामध्ये आपआपले जिवन जगण्यास मोकळे राहतील. अर्जदार क्रं. २ हिला अर्जदार क्रं. १ पासुन कोणतेही मुलबाळ नाही व आज घडीला कुठलीही गर्भधारणा नाही.

०४. अर्जदारांच्या अर्जातील कथन आणि त्यांनी प्रकरणात दाखल केलेली कागदपत्रे यांचा विचार करता खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्गमीत होवून मी त्यांवरील माझे निष्कर्ष मी त्यांच्यासमोर नोंदविलेले असून त्यांची कारणे खालीलप्रमाणे आहेतः-

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करतात काय की, त्या दोघांतील वैवाहिक संबंध अतिशय तणावपूर्ण होउन ते विकोपाला गेले आहेत आणि त्यामुळे ते दोघेही सहसंमतीने घटस्फोट मिळण्यास पात्र आहेत ? | ..होय. |
| २. | हुकूमनामा काय ? | ..अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

०५. अर्जदार क्रं.१ व २ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रं. ७ व ८ अन्वये दाखल केले आहे. अर्जदारांनी विवाहाची निमंत्रण पत्रीका निशाणी क्रं.०९ व अर्जदारांच्या आधारकार्डच्या पडताळणीकृत प्रती निशाणी क्रं.१० व ११ अन्वये इ. कागदपत्र अभिलेखावर दाखल केले आहेत. पुरावा बंदची पुर्सीस निशाणी क्रं.१२ अन्वये दाखल केली आहे.

**<u>मुद्दे क्रं.१ व २ बाबतः-</u>**

०६. अर्जदार क्रं.१ व २ यांनी निशाणी क्रं. ७ व ८ अन्वये दाखल केलेले शपथपत्रातील पुराव्याचे अवलोकन केले असता, अर्जकथन सत्य असल्याचे दिसते. त्यास धुडकाविण्याचे कुठलेही कारण दिसून येत नाही. अनुषंगे उभयंताचे पराकाष्टेचे वैचारीक मतभेदामुळे तडजोडीचे प्रयत्न निष्फळ होवून वैवाहिक संबंध विकोप्यास जावून पुनर्स्थापितीपलिकडे गेल्याचे निष्पन्न होते. अशा परिस्थितीत अकारणास्तव उभय अर्जदारांना त्यांच्या इच्छेविरुध्द एकत्र संसार करण्यात अगर न्यायीक विभक्तीचे आदेश पारीत न केल्यास दोघांच्याही आयुष्याची परवड होईल. अर्जदार क्रं.१ व २ हे एकमेकांना भविष्यामध्ये कुठल्याही प्रकारची खावटी मागणार नाही तसेच मालमत्तेमध्ये हक्क दाखविणार नाही. याबाबत ते न्यायालयामध्ये एकमेकांविरुध्द केस दाखल करणार नाही. फारकतीचा आदेश झाल्यापासून अर्जदार भविष्यामध्ये आपाआपले जिवन

जगण्यास मोकळे राहतील. अर्जदार क्रं.२ हीने तिचा खावटीचा हक्क सोडून दिला आहे. महत्वाचे म्हणजे अर्जदारांची आपसात समझोता होण्याची व पुन्हा एकत्रीतपणे नांदण्याची कोणतीही शक्यता नाही. तसेच प्रस्तुतचे प्रकरण मध्यस्थापुढे पाठविण्यात आले असता तेथेही सदर प्रकरणात मध्यस्थाव्दारे तडजोड होवु शकलेली नाही. त्यामुळे अर्जदारांचा पुरावा, त्यांच्यातील समझोता, त्यांचे वकीलांचे म्हणणे इत्यादी बाबी विचारात घेता घटस्फोटाचा हुकूमनामा देणे योग्य होईल. म्हणूनही सदरचा अर्ज नाकारण्यास कुठलेही सांप्रत अगर संयुक्तीक कारण नसल्यामुळे दोन्ही अर्जदार क्रं.१ व २ सहसंमतीने घटस्फोटाचा हुकूमनामा मिळण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्रं.१ होकारार्थी निर्णित करुन मुद्दा क्रं.२ चे उत्तरी निम्नादेश पारीत करण्यात येत आहेः–

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येते.

२. याद्वारे अर्जदार क्रं.१ व २ यांचे दिनांक ०२.०७.२०२१ रोजी झालेल्या लग्नसंबंधातून प्रस्थापित झालेले पती–पत्नीचे नाते हिंदु विवाह अधिनियमाचे कलम १३–ब अन्वये परस्पर संमतीने हुकुमनाम्याच्या तारखेपासून संपुष्टात आल्याचे व त्यांच्यात सदर तारखेपासून घटस्फोट झाल्याचे घोषीत करण्यात येते.

३. अर्जदार क्रं.१ व २ यांच्यामध्ये पती–पत्नी म्हणून कोणताही संबंध राहाणार नाही.

४. अर्जदारांनी अर्जाचा खर्च स्वतः सोसावा.

५. हिंदु विवाह कायदा,१९५५ च्या कलम २३ (४) अन्वये उभय पक्षकारांना हुकूमनाम्याची प्रत विनामुल्य देण्यात यावी.

६. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

SHIVNATH MANIKRAO KALE

Digitally signed by SHIVNATH MANIKRAO KALE
Date: 2026.03.07 11:02:28 +0530

दिनांक–०६.०३.२०२६.

( शिवनाथ एम. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,**
**अकोट.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S. G. Jaiswal |
| Court Name | : | Civil Judge, S.D., Akot. |
| Date | : | 06/03/2026. |
| Order Signed by P.O on | : | 06/03/2026. |
| Order Uploaded on | : | 06/03/2026. |